**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०८/२०१९** | **दिनांक २५/०१/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविद्या विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १९/०१/२०१९ ते २५/०१/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २६/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून ३०/०१/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/०१ | २०/०१ | २१/०१ | २२/०१ | २३/०१ | २४/०१ | २५/०१ | | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | २९/०१ | ३०/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.४ | ३४.२ | ३४.४ | ३२.२ | २९.४ | २८.६ | २८.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३२ | ३३ | ३४ |
| १३० | १४.० | १३.६ | १३.० | १२.५ | १०.६ | ९.० | **किमान तापमान (अं.से)** | १६ | १६ | १६ | १७ | १७ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | १ | १ | १ | ० |
| ८७ | ८७ | ८९ | ९३ | ८८ | ८५ | ८९ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६४ | ६४ | ६४ | ६२ | ६० |
| ६० | ५८ | ६१ | ५७ | ५६ | ६१ | ६१ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६० | ६० | ६० | ५८ | ५८ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ११ | १६ | २१ | १८ | १६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | ई. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २६ ते ३० जानेवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमान साधारण राहील तसेच वाऱ्याचा वेग ११ ते २१ कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वाल | फुलोरा व शेंगा अवस्था | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| आंबा | मोहोर अवस्था | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• कमी होणाऱ्या रात्रीच्या तापमानाचा आंबा मोहोर येण्यावर परिणाम दिसून येत असल्याने, आंबा बागेत तापमान वाढविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. यामध्ये पहाटेच्या वेळेस जागोजागी वाळलेला पालापाचोळा गोळा करून झाडाच्या विस्ताराखाली पेटवून धूर करावा त्यामुळे बागेतील तापमान वाढण्यास मदत होईल किंवा १ टक्के पोटेशियम नायट्रेटची फवारणी झाडाच्या पानांवर बसेल अशारीतीने करावी. |
| काजू | फळधारणा अवस्था | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• काजूमध्ये फळधारणेच्यावेळी ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत) |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फळधारणा | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• कलिंगड पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी, डायमेथोएट १० मि. ली. किंवा मॅलेथिऑन २० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच शेतामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा.<br>• किमान तापमानात घट संभवत असल्याने फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास संध्याकाळी किंवा रात्रीचे वेळेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे.<br>• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• शेळ्यांमध्ये जंताचे औषध देण्याचे राहिले असल्यास लवकरात लवकर देण्यात यावे. त्यासाठी शेळ्यांना अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**